

महाराष्ट्र

# संरक्षित क्षेत्र वार्तापत्र

वन्यजीव संरक्षणविषयक घडामोडींचे त्रैमासिक

खंड २, अंक ४ ऑक्टोबर २०२१ (क्र.७)

## अनुक्रमणिका

**संपादकीय** ३

परस्परविरोध हीच मूळ समस्या

**संरक्षित क्षेत्रातील बातम्या**

कर्नाळा अभयारण्य/फणसाड अभयारण्य ४

कर्नाळा व फणसाड अभयारण्यांच्या परिसरातील स्थानिकांना पर्यटन मार्गदर्शकाचे प्रशिक्षण

गौताळा औट्रमघाट अभयारण्य ४

गौताळा औट्रमघाट अभयारण्यात अपुरे मनुष्यबळ; वनाधिकारी, कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त

टिपेश्वर अभयारण्यातून आलेल्या वाघाचे ‘गौताळा’ नामकरण

ठाणे क्रीक अभयारण्य ५

कांजूर क्षेपणभूमीमुळे ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्यावर दुष्परिणाम

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प ५

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात व्याघ्रसंख्या तूर्तास स्थिर; नजीकच्या भविष्यात संख्यावाढीची शक्यता

ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात ‘लेसर फ्लॉरीकन’चे दर्शन

मेळघाट व्याघ्र प्रकल्प ६

गाभा क्षेत्राबाहेरून पर्याय उपलब्ध असतानाही मेळघाटातूनच रेल्वे मार्ग नेण्याची मागणी

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील महिला वन कर्मचाऱ्यांच्या छळाच्या तक्रारी

मेळघाटातील वनाधिकारी आत्महत्येप्रकरणी रेड्डी यांच्या विरोधातील गुन्हा रद्द

लोणार अभयारण्य ८

लोणार सरोवराच्या संवर्धनासाठी समिती; सरोवराच्या दुरवस्थेबाबत याचिका प्रलंबित राहणार

सह्याद्री व्याघ्र प्रकल्प ९

सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातून गावे वगळण्याची मागणी

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान ९

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून दोन भुयारी मार्ग प्रकल्पांना पर्यावरणीय मंजुरीची अट नाही

**राज्यस्तरीय बातम्या** १०

राज्यातील वनक्षेत्रपालांच्या बदल्या

वन्यजीव गुन्हे प्रकरणांतील न्यायालयीन आदेशांचा डेटाबेस मोबाईल एप्लिकेशनवर

पश्चिम महाराष्ट्र

सातारा जिल्ह्यातील कराड इथून दोघांना पकडले; वाघ, बिबट्याची ११ नखे सापडली

आजरा, चंदगड तालुक्यांत हत्ती शेतांमध्ये शिरल्यामुळे पिकांचे नुकसान

विदर्भ

गडचिरोली जिल्ह्यात यंदा आठ महिन्यांत वाघाच्या हल्ल्यांत १५ ग्रामस्थ ठार

चंद्रपूर जिल्ह्यात माणूस-वाघ संघर्षाची तीव्रता कायम

नागपूर वन विभागाच्या व्याघ्र तस्करीविरोधी मोहिमेत २९ आरोपींना अटक

अवनी वाघीण मृत्यू प्रकरणः शिकाऱ्याचा शस्त्र परवाना बनावट असल्याचा आरोप


वाशीम जिल्ह्यात वन्य प्राण्यांमुळे शेतीचे नुकसान; विजेच्या धक्क्याने चार नीलगायी ठार

कोकण
सावंतवाडी, दोडामार्ग तालुक्यांत पहिल्या सर्वेक्षणात वन्य प्राण्यांच्या दुर्मीळ जातींसह १९ जातींची नोंद
आंबोली इथे बुरशीच्या जातीची प्रथमच नोंद
मुंबई महानगर प्रदेश
नवी मुंबईतील खारघर खाडीत दुर्मीळ 'स्मूथ-कोटेड ऑटर'च्या जोडीचे दर्शन
माणूस-बिबट्या संघर्ष १७
राज्यातील ६५ टक्के बिबटे संरक्षित क्षेत्र व राखीव वनांच्या बाहेर; मानवी वसाहतींजवळ वावर वाढला
माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त १८

**राष्ट्रीय बातम्या** १८
संरक्षित क्षेत्रे, संवेदनशील पर्यावरण क्षेत्रे आणि वन्यजीव संचारमार्गांत येणाऱ्या प्रकल्पांवर खर्चाच्या दोन टक्के कर आकारणीचा राष्ट्रीय वन्यजीव मंडळाचा निर्णय
पिंजऱ्यांत जन्मलेल्या, वाढलेल्या गिधाडांचे नैसर्गिक अधिवासात यशस्वी पुनर्वसन
पशुंच्या आणखी एका औषधामुळे भारतातील गिधाडांच्या अस्तित्त्वाला धोका
भारतात वर्ष २०२२ मध्ये प्रथमच शास्त्रीय पद्धतीने हत्तींची गणना
देशात बिबट्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर; सर्वाधिक बिबटे मध्य प्रदेशात

**आंतरराष्ट्रीय बातम्या** २२
ईशान्य चीनमधील चार भूप्रदेशांमध्ये वाघांना सुयोग्य अधिवासः एका अभ्यासाचा निष्कर्ष

**दृष्टीकोन** २४
IUCNच्या सातव्या कॉंग्रेसच्या निमित्ताने...



**महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र**
**खंड २, अंक ४, ऑक्टोबर २०२१ (क्र. ७)**
संपादकः रेश्मा जठार
साहाय्यक संपादकः पंकज सेखसरीया
साहाय्यकः राधिका अघोर
शीर्षक व इतर रेखाचित्रेः अश्विनी मेनन Visual Design Studio
प्रकाशकः कल्पवृक्ष
**संपादकीय पत्ताः** C/o कल्पवृक्ष, अपार्टमेंट ५, श्री दत्त कृपा, ९०८, जिमखाना, पुणे ४११००४, महाराष्ट्र, भारत.
**दूरभाष/फॅक्सः** ०२० २५६५४२३९ **ई मेलः**marathipaupdate@gmail.com
**संकेतस्थळः** https://kalpavriksh.org/documentation-outreach/newsletters/
***
टीपः 'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'त प्रकाशित बातम्या या त्या त्या बातमीखाली दिलेल्या मूळ प्रकाशनातील बातम्यांवर संपादकीय सोपस्कार करून प्रकाशित केलेल्या आहेत.
***
'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'च्या प्रकाशनासाठी अर्थसाहाय्य
**दुलीप मथ्थाई नेचर कॉन्झर्वेशन ट्रस्ट**
c/o फाऊण्डेशन फॉर इकॉलॉजिकल सेक्युरिटी http://fes.org.in/
आणि
**अनेक हितचिंतकांच्या वैयक्तिक देणग्या**
***

## संपादकीय

### परस्परविरोध हीच मूळ समस्या

'महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्रा'च्या प्रस्तुत अंकातील काही बातम्या वाचल्यावर वाटते आहे की सूक्ष्म कणांपासून ते अवकाशस्थ दृश्यअदृश्य घटकांचा वेध घेण्याची, प्रगत राष्ट्रांची बरोबरी करण्यासाठी अर्थव्यवस्थेची वाढ कायम राखण्याची मनीषा बाळगणाऱ्या भारतीय मानसाला पर्यावरणशास्त्र समजत नाही किंवा कळते पण वळत नाही.

समस्या जुनीच आहे; गिधाडांच्या संवर्धनाची. गिधाडांच्या संरक्षण-संवर्धनासाठी बंदिस्त प्रजनन केंद्रे निर्माण केल्याला जवळपास दोन दशके होतील. त्यासाठी केलेल्या आर्थिक, मनुष्यबळ आदी संसाधनांच्या गुंतवणुकीचे फायदे आता कुठे जेमतेम दिसू लागत आहेत. बंदिस्त प्रजनन केंद्रात जन्मलेल्या, वाढलेल्या गिधाडांचे वन्य अधिवासात पुनर्वसन करण्याच्या प्रयत्नांना यश मिळण्याची चिन्हे गेल्या वर्षभरात दिसू लागली आहेत.

असे असतानाच बातमी येऊन धडकली आहे ती गिधाडांच्या अस्तित्त्वाला धोकादायक अशा नव्या पशुवैद्यक औषधांची. मुळात, गिधाडांची संख्या कमी होण्यामागे असलेल्या विविध कारणांमध्ये डायक्लोफेनॅक हा घटक असलेले पशुवैद्यक औषध हे एक महत्त्वाचे कारण असल्याचे दिसून आले होते. बंदिस्त प्रजनन केंद्रात गिधाडांचे प्रजनन घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू झाले तेव्हापासूनच गिधाड संवर्धनाच्या या प्रयत्नांना खऱ्या अर्थाने यश येण्याकरता; म्हणजे बंदिवासात जन्मलेल्या, वाढलेल्या गिधाडांचे नैसर्गिक अधिवासात पुनर्वसन यशस्वी होण्याकरता निसर्गातील अन्नसाखळीतून डायक्लोफेनॅक काढून टाकण्यासाठी आवश्यक पावले उचलण्याची गरज पर्यावरण तज्ञ, अभ्यासक व जाणकार व्यक्त करत आले आहेत. डायक्लोफेनॅक काढून टाकायचे याचा अर्थ केवळ डायक्लोफेनॅक असा नव्हे; तर डायक्लोफेनॅक हे प्रातिनिधीक लक्षात घेऊन तत्सम कोणताही घटक पुन्हा अन्नसाखळीत येणार नाही याबाबत सावधानता बाळगणे असा अभिप्रेत आहे. मात्र, अन्य घटक सोडाच डायक्लोफेनॅकवर बंदी घालूनसुद्धा त्याचा बेकायदा वापर थांबवणे आपल्याला शक्य झाले नाही. त्यात आता अन्य तीनचार औषधांची भर पडली आहे.

आपल्या एकूणच वन्यजीव संवर्धनाची ही व्यथा आहे. आजघडीला देशाच्या विविध भागांमध्ये वन्यजीवांच्या त्या त्या भागात मोठ्या संख्येने असलेले प्रामुख्याने मोठे सस्तन प्राणी जसे की वाघ, बिबट्या, हत्ती, गवा इत्यादी जाती विरुद्ध माणूस अशी संघर्षाची परिस्थिती आहे.

राज्यात मनुष्यवस्तीजवळ आणि काही ठिकाणी तर मनुष्यवस्तीतही बिबट्यांचा वावर वाढताना दिसत आहे. तरीदेखील मुंबईसारख्या दाट लोकवस्तीच्या शहरात असलेला, बिबट्यांना मानवलेला वन्य अधिवास अर्थात संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचे या ना त्या प्रकल्पामार्फत लचके तोडायचे आपले धोरण कायम आहे.

व्याघ्र प्रकल्प निर्माण करून त्यासाठी प्रचंड गुंतवणूक करून वाघांची संख्या तर आपण वाढवली. मात्र, या वाढीव संख्येला सामावून घेणारे अधिवास टिकून राहायला हवेत, हे सोयीस्कररित्या विसरलो. परिणामी, देशातील विविध भागांमध्ये उरलेल्या व्याघ्र अधिवासांच्या भोवतालच्या प्रदेशांमध्ये माणूस-वाघ संघर्षाची तीव्रता सातत्याने वाढताना दिसते आहे.


ही परिस्थिती स्पष्ट दिसत असतानाही उरलेसुरले वन्य अधिवास टिकवून ठेवण्याऐवजी त्यातही वेगवेगळ्या पळवाटांचा वापर करून नवनवे विकास प्रकल्प आणण्याकडेच आपला कल आहे. राष्ट्रीय वन्यजीव मंडळाचा कर आकारणीबाबतचा निर्णय ही अशीच एक पळवाट आहे.

म्हणूनच, एकतर आपल्याला पर्यावरणशास्त्र समजलेले नाही किंवा मग कळते आहे पण वळत नाही. दोहोंपैकी कोणतीही बाब खरी असली तरी ती आपल्याच मूळावर उठणार हे निश्चित.

# संरक्षित क्षेत्रातील बातम्या

## कर्नाळा अभयारण्य/फणसाड अभयारण्य

**कर्नाळा व फणसाड अभयारण्यांच्या परिसरातील स्थानिकांना पर्यटन मार्गदर्शकाचे प्रशिक्षण**



पर्यटन हे पर्यटकांसाठी केवळ छंदापुरते मर्यादित न राहता त्याला शैक्षणिक आणि व्यावसायिक जोड देण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन संचालनालय विभाग पर्यटन मार्गदर्शक नेमणार आहे.

भारत सरकारच्या मान्यताप्राप्त आयआयटीएम संस्थेकडून कर्नाळा अभयारण्य परिसरातील २० व फणसाड अभयारण्य परिसरातील ११ अशा एकूण ३१ स्थानिक आदिवासी युवक-युवतींना पर्यटन मार्गदर्शकाचे काम करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण देण्यात येत आहे. दोन ऑगस्टपासून प्रशिक्षण वर्ग कर्नाळा अभयारण्यात सुरू करण्यात आले आहेत.

**सूत्र** - 'पर्यटकांना वाट दाखविणार आदिवासी बांधव', maharashtratimes.com, ०४.०८.२०२१.

## गौताळा औट्रमघाट अभयारण्य

**गौताळा औट्रमघाट अभयारण्यात अपुरे मनुष्यबळ; वनाधिकारी, कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त**

गौताळा औट्रमघाट अभयारण्यातील कन्नड क्षेत्रात सहाय्यक वन संरक्षकाचे पद काही महिन्यांपासून रिक्त असून पाटणादेवी चाळीसगाव क्षेत्रातही वन परिक्षेत्र अधिकाऱ्याच्या पदासह अनेक पदे रिक्त आहेत. खेरीज नागद क्षेत्रातही पदे रिक्त आहेत. त्यामुळे अभयारण्याच्या संरक्षणासाठी अपुरे मनुष्यबळ हा चिंतेचा विषय बनला आहे.

विदर्भातून आलेल्या एका वाघाने अभयारण्यात जवळपास गेले सात महिने मुक्काम ठोकला आहे (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड २ अंक २ क्र.* ५). खेरीज, अभयारण्यातील चंदनाच्या तस्करीसह अन्य मूल्यवान दगडाच्या चोरीच्या घटनाही समोर आल्या आहेत.

अभयारण्याच्या संरक्षण, संवर्धनासाठी वन्यजीव विभागाचे सुमारे ४७ अधिकारी, कर्मचारी सध्या कार्यरत आहेत, परंतु महत्त्वाची अनेक पदे रिक्त आहेत (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड २ अंक ३ क्र.* ६).

**सूत्र** - 'वन संरक्षणासाठी अपुरे मनुष्यबळ', maharashtratimes.com, ०३.०८.२०२१.

**टिपेश्वर अभयारण्यातून आलेल्या वाघाचे 'गौताळा' नामकरण**

यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर अभयारण्यातून आलेला वाघ जळगाव जिल्ह्यातील गौताळा औट्रमघाट अभयारण्यात स्थिरावला आहे. साताठ महिन्यांपासून मुक्काम ठोकल्याने वाघाला 'गौताळा' असे नाव दिले आहे. हा वाघ पांढरकवड्यातून तेलंगणामध्ये गेला, तिथून परत नांदेड, किनवट, पुसद, बुलडाणा जिल्ह्यातील ज्ञानगंगा अभयारण्य, अजिंठामार्गे अंदाजे दोन हजार किमी प्रवास करून गौताळ्यात आला आहे.

गौताळ्यात यंदा फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात हा वाघ आढळला (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड २ अंक २ क्र.* ५).

गौताळ्यात १९४० मध्ये सर्वप्रथम वाघ आढळून आला होता. त्यानंतर १९८१ मध्ये म्हणजे ४० वर्षापूर्वी वाघ दिसला होता. त्यानंतर आईपासून विभक्त झालेला एक अडीच वर्षांचा वाघ डिसेंबर २०१९ मध्ये अजिंठा वनक्षेत्रात आला होता. तो वाघ काही दिवस मुक्काम केल्यावर तो परतीच्या मार्गावर गेला. तो वाघही टिपेश्वर अभयारण्यातील असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**सूत्र** - राजेश रामपूरकर. 'विदर्भातील वाघ खानदेशात स्थिरावला; 'गौताळा' असे केले नामकरण', www.esakal.com, ०२.०८.२०२१.

## ठाणे क्रीक अभयारण्य

### कांजूर क्षेपणभूमीमुळे ठाणे क्रीक फ्लेमिंगो अभयारण्यावर दुष्परिणाम



कांजूर क्षेपणभूमीमुळे ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्य परिसरावर झालेल्या दुष्परिणामांची माहिती समोर आली आहे. क्षेपणभूमीतून ठाणे खाडी व सभोवतालच्या परिसरात शास्त्रीय पद्धतीने योग्य प्रक्रिया न करताच अनेक घातक, रसायने मिश्रित द्रव सातत्याने मिसळत आहेत.

भांडुप पम्पिंग स्टेशन इथे जैवविविधता नोंदणीचे काम 'वातावरण फाऊंडेशन' आणि 'मिनिस्ट्री ऑफ मुंबईज् मॅजिक' या दोन संस्थांमार्फत सुरू आहे. मुंबईची लोक जैवविविधता नोंदवही तयार करण्यासाठी या संस्थांनी हाती घेतलेल्या सर्वेक्षणादरम्यान खाडीची दुरवस्था दिसून आली आहे.

कांजुरची क्षेपणभूमी अस्तित्त्वात येण्यापूर्वी म्हणजे वर्ष २००८च्या आधी विक्रोळी, कांजुर, भांडुप, नाहूर, कोपरी, नानेपाडा, नवघर, गवाणपाडा, विटावा, ऐरोली व दिवा या परिसरात राहणारे मच्छिमार ठाणे खाडीत मासे पकडण्यासाठी येत. मात्र आता त्यांच्या मासेमारीवर खाडीतील प्रदूषणाचा परिणाम दिसून येत आहे. भरतीच्या वेळी प्रदूषित पाणी संपूर्ण ठाणे खाडी व कांदळवन क्षेत्रावर पसरते. या भागामध्ये मासे प्रजोत्पादनासाठी येतात, त्यांच्या प्रजननावरही याचा परिणाम झाल्याचे दिसून येते, असे स्थानिकांचे म्हणणे आहे.

या संदर्भात मुख्यमंत्री कार्यालय व राज्याच्या पर्यावरणमंत्र्यांना स्थानिकांनी पत्र पाठवले आहे. ठाणे खाडीचे पर्यावरण राखण्यासाठी परिसरात असलेल्या पाणथळ जागांचे व भरतीच्या प्रभावाखालील सर्व खाड्यांचे पुनरुज्जीवन करावे, खाड्यांमध्ये येणाऱ्या भरतीच्या पाण्याचे सर्व मार्ग मोकळे करावेत, पाणथळ प्रदेश संरक्षित करून त्याला 'ना विकास क्षेत्र' घोषित करावे, क्षेपणभूमीचे काम किनारपट्टी नियमन क्षेत्राबाहेर नेण्यात यावे, ठाणे खाडी परिसरातील ज्या मच्छिमारांची उपजीविका या खाडीतील मासेमारीवर अवलंबून होती, त्यांना नुकसानभरपाई द्यावी आदी मागण्यांचा पत्रात समावेश आहे.

ठाणे खाडी व सभोवतालचा परिसर प्रदूषित केल्यामुळे मासेमारीचे क्षेत्र व माशांचे खाद्य ह्या दोन्ही बाबी प्रभावित झाल्या आहेत हे लक्षात घेता महाराष्ट्र सरकार आणि मुंबई महानगरपालिका यांच्यावर भारतीय मत्स्योद्योग कायदा १९६० गुन्हा नोंदवण्याची मागणीही करण्यात आली आहे.

**सूत्र** – 'डम्पिंगमुळे जलस्रोत बाधित', maharashtratimes.com, १५.०९.२०२१.

## ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प

### ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात व्याघ्रसंख्या तूर्तास स्थिर; नजीकच्या भविष्यात संख्यावाढीची शक्यता




भारतीय वन्यजीव संस्था – WII च्या सहकार्याने केल्या जाणाऱ्या वार्षिक अभ्यासानुसार चौथ्या टप्प्याच्या प्रगणनेनुसार वर्ष २०२० मध्ये ताडोबा अंधारी व्याघ्र


प्रकल्पात बफर व गाभा क्षेत्र मिळून ८५ वाघ दिसून आले आहेत. इथे २०१० मध्ये १७ वाघांचे अस्तित्व दिसून आले होते. त्यानंतर ताडोब्याच्या क्षेत्रात बफर क्षेत्राची भर पडली आणि २०१२ मध्ये ४९ वाघ दिसून आले. २०१२ पासून २०१५ पर्यंत ताडोबातील व्याघ्रसंख्येत उत्तरोत्तर वाढ दिसत होती. मात्र मागील काही वर्षात ही संख्या स्थिर असल्याचे समोर आले आहे. प्रकल्पात सुमारे ८५ ते ९० दरम्यान वाघांची संख्या स्थिरावली आहे.

तृणभक्षी प्राण्यांची संख्या मुबलक असल्यानेच ताडोबात व्याघ्रवाढ दिसून आल्याचे मत WII चे वरिष्ठ संशोधक डॉ. यादवेंद्र झाला यांनी व्यक्त केले. मात्र, क्षेत्र व अन्नसाखळी बघता आता व्याघ्रवाढ अवघड वाटते. संख्या वाढल्यास वाघांच्या झुंजीच्या घटना वा माणूस-वन्यजीव संघर्षाच्या घटना घडू शकतील असे ते म्हणाले.

प्रकल्पातील रानतळोधी पूर्ण व कोळसा अर्धे गाव जमिनीचा प्रश्न सुटल्यावर प्रकल्पाबाहेर जातील. त्यामुळे ताडोबात वन्यजीवांना आणखी मोकळा अधिवास मिळेल. त्यानंतरच्या पुढील काही वर्षात अन्य वन्यजीवांसोबत वाघांच्या संख्येत आणखी वाढीची दाट शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

यंदा जानेवारी ते जुलै या काळात भारतात ८४ वाघांचा मृत्यू झाला. त्यात सर्वाधिक २७ मृत्यू हे मध्य प्रदेशात; त्यापाठोपाठ महाराष्ट्रात १९ व कर्नाटकात १२ असे आहेत. यात शिकारीच्या नऊ घटना आहेत. व्याघ्र प्रकल्पात ४३ वाघांचा मृत्यू झालेला असून उर्वरीत मृत्यू व्याघ्र प्रकल्पांबाहेर झाले आहेत.

**सूत्र** - पंकज मोहरीर. ‘ताडोब्यात वाघांची संख्या स्थिरावली’, maharashtratimes.com, २९.०७.२०२१.



**ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात ‘लेसर फ्लॉरीकन’चे दर्शन**


ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात दुर्मीळ तणमोर (लेसर फ्लॉरीकन) पक्षी आढळला आहे.

ताडोबा व्यवस्थापनाने प्राणी व पक्ष्यांच्या हालचाली टिपण्यासाठी स्वयंचलित कॅमेरे लावले होते. या कॅमेऱ्यांमध्ये तणमोराच्या मादीचे छायाचित्र आले आहे. तणमोराची संख्या झपाट्याने कमी होत आहे. देशात केवळ २६४ तणमोर पक्षी शिल्लक आहेत. त्यामुळे ताडोबात आढळलेल्या मादी तणमोराच्या संरक्षण व संवर्धनासाठी ताडोबा व्यवस्थापन सरसावले आहे.

**सूत्र** - रवींद्र जुनारकर. ‘ताडोबात आढळला अतिदुर्मिळ ‘तणमोर’; पक्षी प्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण’, www.loksatta.com, ०४.०८.२०२१.

## मेळघाट व्याघ्र प्रकल्प

**गाभा क्षेत्राबाहेरून पर्याय उपलब्ध असतानाही मेळघाटातूनच रेल्वे मार्ग नेण्याची मागणी**



अकोला, अकोट, धूळघाट, डाबकामार्गे अस्तित्त्वात असलेला खंडवा मीटरगेज रेल्वेमार्ग ब्रॉडगेजसाठी अन्यत्र न वळवता मेळघाटातून जुन्याच मार्गाने नेऊन मेळघाटातील आदिवासींना त्याचा लाभ मिळावा, अशी मागणी खासदार नवनीत राणा यांनी रेल्वे मंत्र्यांकडे केली आहे.

वाघांच्या अधिवासाला धोका पोहोचण्याची शक्यता लक्षात घेता मेळघाट व्याघ्र प्रकल्पातून जाणाऱ्या रेल्वेमार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रुपांतर करू नये. त्याऐवजी अकोला-खंडवा हा प्रस्तावित ब्रॉडगेज मार्ग इतर पर्यायी

भागातून करावा, अशी विनंती मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी तत्कालीन रेल्वे मंत्री पीयूष गोयल आणि तत्कालीन केंद्रीय पर्यावरण मंत्री प्रकाश जावडेकर यांना पत्राद्वारे केली होती. इतर पर्यायी मार्गाचे परिवर्तन करायचे ठरविले तर एकीकडे मेळघाटातील वाघांच्या अधिवासाला धक्का लागणार नाही; हा रेल्वे मार्ग हिवरखेड मार्गे नेल्यास व्याघ्र प्रकल्पाचे नुकसान होणार नाही व जास्तीतजास्त गावांना जोडता येईल, अशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी घेतली.

पूर्णा-खंडवा हा मीटरगेज रेल्वे मार्ग राजस्थानमधील जयपूर, अजमेर, चित्तोडगढ, मध्य प्रदेशातील रतलाम, इंदोर, महू आणि खंडवा, महाराष्ट्रातील अकोला, पूर्णा, नांदेड, मुदखेड आणि तेलंगणातील निझामाबाद आणि सिकंदराबाद या शहरांना जोडतो. मेळघाटमधून जाताना या रेल्वेचा वेग संथ असे. त्यामुळे वन्यप्राण्यांच्या रेल्वे अपघातांचे प्रमाण कमी होते. पण, मेळघाटमधील गावांचा या रेल्वेशी असणारा संबंधदेखील कमी होता. मेळघाटातील वनौषधी, हरणाची शिंगे, लाकडाच्या मोळ्या खंडवापर्यंत वाहून नेण्यास अत्यंत सोयीचे वाहन अशी या रेल्वेची ओळख बनली होती. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाकडे या सर्व वनगुन्ह्याची यादी उपलब्ध असल्याचे वन्यप्राणीप्रेमींनी म्हटले आहे.

प्रस्तावित ब्रॉडगेजमुळे या भागातून मोठ्या प्रमाणावर रेल्वे वाहतूक वाढेल परिणामी प्रकल्पाच्या गाभा क्षेत्रातील वन्य अधिवासाचा ऱ्हास होण्याची शक्यता आहे. शिवाय या परिवर्तनामुळे रेल्वेगाड्यांचा वेगही वाढेल. मुळातच हा गाभा अबाधित व सुरक्षित ठेवण्यासाठी इथल्या १६ आणि गाभ्याबाहेरील सहा गावांचे इतरत्र पुनर्वसन करण्यात आले. ही गावे या रेल्वे मार्गाच्या १० किमी परिघातील होती. गावांचे पुनर्वसन आणि अधिवासाच्या संवर्धनासाठी प्रयत्न केल्याने इथे वन्यजीवन झपाट्याने वाढले. भारतीय वन्यजीव संस्था WIIने देखील या भागातून रेल्वेमार्गाचे ब्रॉडगेज न करता इतर पर्यायी भागातून करावे, अशी सूचना केली आहे.

केंद्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण - NTCAने क्षेत्र भेट देण्यासाठी २०१५ मध्ये त्रिसदस्यीय समिती नेमली होती. या समितीनेही मेळघाटच्या गाभा क्षेत्रातून ब्रॉडगेज करण्यापेक्षा गाभा क्षेत्राबाहेरून जाणारे दोन पर्यायी मार्ग वन्यजीव संरक्षणाच्या उपाययोजनांसह डिसेंबर २०१७ मध्ये केंद्र शासनास सादर केले आहेत.

**सूत्र** - मोहन अटाळकर. 'मेळघाटातील रेल्वेवरून पुन्हा राजकारण', www.loksatta.com,१३.०८.२०२१.




**मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील**
**महिला वन कर्मचाऱ्यांच्या छळाच्या तक्रारी**

गेल्या चार-पाच महिन्यांमध्ये मेळघाटातील महिला वन कर्मचाऱ्यांच्या छळाच्या चार तक्रारी उघड झाल्या आहेत.

चौराकुंड परिक्षेत्रात कार्य करणाऱ्या एका महिला कर्मचाऱ्याच्या शासकीय निवासस्थानी मध्यरात्री पोहचून वनपरिक्षेत्र अधिकारी आणि लिपिकाने मद्यधुंद अवस्थेत गोंधळ घातल्याची एक तक्रार आहे. या प्रकरणी वरिष्ठांकडे तक्रार करण्यात आल्यानंतर एका प्रकरणात लिपिकाला निलंबित करण्यात आले असून एका वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचा प्रस्ताव सिपना वन्यजीव विभागातर्फे मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्र संचालक तथा मुख्य वन संरक्षक कार्यालयाला पाठवण्यात आला आहे. अशाच प्रकारच्या चार तक्रारी महिला कर्मचाऱ्यांनी कार्यालयाकडे केल्या असून त्याबाबत चौकशी सुरू आहे.

**सूत्र -** 'मेळघाटातील महिला कर्मचाऱ्यांचा छळ सुरूच', www.loksatta.com, ०४.०८.२०२१.

### मेळघाटातील वनाधिकारी आत्महत्येप्रकरणी रेड्डी यांच्या विरोधातील गुन्हा रद्द

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील हरिसालच्या वनपरिक्षेत्र अधिकारी दीपाली चव्हाण यांच्या आत्महत्येप्रकरणी मेळघाटचे क्षेत्र संचालक श्रीनिवास रेड्डी यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेला गुन्हा न्यायालयाने रद्द ठरवला आहे.

रेड्डी यांच्या विरोधात धारणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड २ अंक २ क्र.* ५). हा गुन्हा रद्द करण्याची मागणी करणारी याचिका त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासमोर केली होती. या याचिकेच्या सुनावणीनंतर न्यायालयानं गुन्हा रद्द करण्याचे आदेश दिले आहेत.

**सूत्र** – 'दीपाली चव्हाण आत्महत्या प्रकरण: श्रीनिवास रेड्डींविरोधातील गुन्हा रद्द; उच्च न्यायालयाचा निर्णय', www.loksatta.com, १३.०८.२०२१.

## लोणार अभयारण्य

### लोणार सरोवराच्या संवर्धनासाठी समिती; सरोवराच्या दुरवस्थेबाबत याचिका प्रलंबित राहणार



लोणार सरोवराचा विकास आणि संवर्धनासाठी राज्य शासनाने लोणार विकास समिती स्थापन केली आहे. समितीची स्थापना केल्याने याचिका निकाली काढण्याची विनंती राज्य शासनाने उच्च न्यायालयाला केली. यावर न्यायालयाने काही काळासाठी ही याचिका प्रलंबित ठेवण्याचा निर्णय घेतला. याचिका प्रलंबित ठेवल्याने सरोवराच्या विकासकामांबाबत येणाऱ्या अडचणी न्यायालयासमक्ष मांडता येतील, असा निष्कर्ष न्यायालयाने काढला.

लोणार सरोवराची दुर्दशा झाल्याबाबत जनहित याचिका २००९ पासून प्रलंबित आहे. या प्रकरणी सुनावणी दरम्यान स्थापन केलेल्या समितीमध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या आदेशानुसार १४ सदस्यांची नेमणूक केल्याची माहिती शासनाने खंडपीठाला दिली. यावर न्यायालयाने या समितीची दोन आठवड्यांमध्ये बैठक आयोजित करीत तीन आठवड्यांमध्ये अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. तसेच समितीला आराखडा तयार करताना न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशा विषयी माहिती असावी म्हणून २००९ पासून आजवर दिलेल्या प्रत्येक आदेशाची प्रत सोपविण्याची व्यवस्था करण्याचे आदेश न्यायालयीन रजिस्ट्री विभागाला दिले. पुढील सुनावणी चार महिन्यांनी निश्चित केली.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार अमरावती विभागाचे विभागीय आयुक्त या समितीचे अध्यक्ष असतील. सहअध्यक्ष म्हणून मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सदस्य सचिव म्हणून बुलडाण्याचे जिल्हाधिकारी यांची नेमणूक केली आहे. सदस्य म्हणून अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू, बुलडाणा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता, नगररचना विभागाचे उपसंचालक, पर्यटन विकास महामंडळाचे प्रादेशिक व्यवस्थापक, पुरातत्त्व विभागाचे अधीक्षक, वरिष्ठ विधिज्ञ यांच्यासह एकूण १४ तज्ज्ञांची नेमणूक केली आहे.

**सूत्र -** केतन पळसकर. 'लोणार विकास समितीची स्थापना; राज्य शासनाची उच्च न्यायालयात माहिती', www.esakal.com, २५.०८.२०२१.

## सह्याद्री व्याघ्र प्रकल्प

### सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातून गावे वगळण्याची मागणी



म्हाळुंगे, मोरणी आरव, पुनर्वसित मोरणी, वलवण, शिंदी, चकदेव, पर्वत व मेटशिंदी ही गावे कोयना अभयारण्य आणि सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातून वगळावीत, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

जुलै महिन्याच्या २२ व २३ तारखेला कांदाटी खोऱ्यात झालेल्या अतिवृष्टीच्या अनुषंगाने या भागातील ग्रामस्थांची आरव इथे बैठक झाली. बैठकीला ग्रामस्थांसह कांदाटी विकास संघाचे कार्यकर्ते उपस्थित होते. या बैठकीत बफर क्षेत्रातून गावे वगळण्याबाबत निवेदन तयार करण्यात आले.

कांदाटी खोऱ्यात अतिवृष्टी होऊन फार मोठ्या प्रमाणात भूस्खलन झाले. कित्येक हेक्टर क्षेत्र नष्ट झाले असून मोठ्या प्रमाणात जंगल नष्ट होऊन भागातील १६ गावांतील शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. या खोऱ्यामध्ये जवळपास ९० ते ९५ टक्के भूस्खलन हे वन जमिनीमध्ये आहे. इथे जैविक व निसर्गाची मोठ्या प्रमाणात हानी झालेली असताना वन विभागाचा एकही वरिष्ठ अधिकारी या भागांमध्ये फिरकला नाही. हे लक्षात घेता कांदाटी खोऱ्यातील सात गावे अभयारण्यातून वगळण्यात यावीत, अशी मागणी बैठकीत सर्वानुमते करण्यात आली.

**सूत्र** - रविकांत बेलोशे. ‘सह्याद्री व्याघ्र प्रकल्पातून गावे वगळा; कांदाटी खोऱ्यातील ग्रामस्थांची मागणी’, www.esakal.com, ०७.०९.२०२१.

## संजय गांधी राष्ट्रीय उद्यान

### संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून दोन भुयारी मार्ग प्रकल्पांना पर्यावरणीय मंजुरीची अट नाही

गोरेगाव-मुलुंड जोडमार्ग - GMLR आणि ठाणे-बोरिवली जोडमार्ग - TBLR या दोन्ही प्रकल्पांचा भाग असलेली भुयारे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाखालून प्रस्तावित असून त्यांच्या बांधकामाला पुढच्या वर्षी सुरुवात होणार आहे. मात्र, संरक्षित क्षेत्रातून जाणाऱ्या या दोन्ही रस्ते प्रकल्पांना प्रतिबंधात्मक पर्यावरणीय प्रभाव मूल्यांकन - EIAच्या अटीतून सूट देण्यात आली आहे.

या दोन्ही जोडमार्ग प्रकल्पांनी पर्यावरणीय मंजुरीसाठी केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाकडे वर्ष २०१७ मध्ये आपापले अर्ज केले होते. मात्र, मंत्रालयाने सारखेच स्पष्टीकरण देऊन दोन्ही प्रकल्पांचे अर्ज फेटाळले आहेत. हे दोन्ही रस्ते राज्य अथवा राष्ट्रीय महामार्ग नाहीत त्यामुळे त्यांना पर्यावरणीय मंजुरीची आवश्यकता नाही, असे स्पष्टीकरण मंत्रालयाने दिले आहे. हे स्पष्टीकरण २००६च्या EIA तरतुदीला धरून आहे कारण या तरतुदीत रस्तेबांधणीचा समावेश नाही.

मात्र, संरक्षित क्षेत्राखालून भुयारे खोदण्याचा समावेश हे या प्रकल्पांचे वेगळेपण आहे. अशा प्रकारचा हे प्रकल्प देशातील पहिलाच प्रयत्न ठरणार आहेत. ही बाब लक्षात घेता पर्यावरणवादी व पर्यावरणतज्ज्ञांनीही या प्रकल्पांना राष्ट्रीय वन्यजीव मंडळ – NBWLच्या मंजुरीसह पर्यावरणीय मंजुरीही बंधनकारक करण्याचा आग्रह धरला आहे.


बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या GMLR प्रकल्पाचे ४.७ किमी लांबीचे दुपदरी भुयार आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या TBLR प्रकल्पाचे जवळपास आठ किमी लांबीचे भुयार GMLRच्या भुयाराला समांतर असणार आहे. TBLR तुंगारेश्वर अभयारण्यापासून अवघ्या १५३ मीटर अंतरावरून जाणार आहे. तसेच, कर्नाळा पक्षी अभयारण्याच्या सीमेपासून

९०० मीटर अंतरावरून आणि माथेरान संवेदनशील पर्यावरण क्षेत्राच्या त्रिज्येच्या आतून जाणार आहे.

खेरीज, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचा प्रस्तावित विरार-अलिबाग बहुद्देशीय मार्ग; या शिवाय, दिल्ली-जवाहरलाल नेहरू बंदर न्यास मालवाहतूक मार्गही संजय गांधी उद्यानातून जाणार आहे. या दोन्ही प्रकल्पांना वेगवेगळी पर्यावरणीय मंजुरी देण्यात आली आहे. मात्र, या सगळ्या प्रकल्पांचा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील परिसंस्थांवर संभाव्य एकत्रित परिणाम अभ्यासणे तसेच भुयारी मार्गांचा तुळशी व विहार तलावांवरील संभाव्य परिणामांचा वेगळा अभ्यास होणे गरजेचे आहे.

दरम्यान, महानगरपालिकेच्या एका अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार GMLRचे संभाव्य परिणाम अभ्यासण्याचे काम 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी'या बिनसरकारी संस्थेला सोपवण्यात आले आहे.

**सूत्र** – प्रयाग अरोरा-देसाई. 'Tunnel projects near Mumbai's SGNP made U-turn on green nod?', www.hindustantimes.com, २३.०८.२०२१.



## राज्यस्तरीय बातम्या

**राज्यातील वन क्षेत्रपालांच्या बदल्या**



प्रधान मुख्य वन संरक्षकांच्या निर्देशानुसार राज्यातील वन क्षेत्रपालांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

त्र्यंबकेश्वर, हरसूल, सुरगाणा या वनक्षेत्राला रखवालदार नसल्याने तिथल्या संरक्षणाची अतिरिक्त जबाबदारी नाशिकच्या इतर अधिकाऱ्यांकडे होती. मात्र, ब्रह्मगिरीचे अवैध उत्खनन, दरड कोसळणे यांसह इतर कारणास्तव या धोक्यात आलेल्या वनक्षेत्राला पूर्णवेळ वनपरिक्षेत्र अधिकारी नियुक्त करण्याची मागणीने जोर धरला होता. धुळे जिल्ह्यातील वन्यजीव विभागाच्या पाल अभयारण्याचे वनपरिक्षेत्र अधिकारी राजेश पवार यांची त्र्यंबकेश्वर वनक्षेत्रातील रिक्त जागेवर बदली करण्यात आली आहे. त्यामुळे त्र्यंबकेश्वरला पूर्णवेळ अधिकारी मिळाला आहे. परिणामी ब्रह्मगिरी संवर्धनाच्या प्रस्तावाचा पाठपुरावा आणि वन हद्द अधिक सुरक्षित होईल, अशी अपेक्षा वनाधिकारी, कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

नांदेड सामाजिक वनीकरणाच्या विशेष कार्य विभागातील पूजा जोशी यांची दिंडोरी, उस्मानाबाद सामाजिक वनीकरण कळंबचे सचिन लोंढे यांची संगमनेर-१, मेवासीमधील तळोदा रोहयोचे चंद्रकांत कासार यांची नांदगाव, यावल पश्चिम प्रादेशिकचे विशाल कुटे यांची सामाजिक वनीकरण नाशिक, जामन्या वन्यजीवचे अक्षय म्हेत्रे यांची येवला, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील विशेष संरक्षण दल-१च्या मनीषा जाधव यांची सिन्नर प्रादेशिक, पांढरकवडातील जामणीचे सुनील मेहेर यांची

सामाजिक वनीकरण राहता, गुगामलच्या ढाकणा वन्यजीवचे हिरालाल चौधरी यांची सामाजिक वनीकरण इगतपुरी अशा बदल्या करण्यात आल्या आहेत.

अहमदनगरमधील कर्जत प्रादेशिकचे गणेश छबीलवाड यांची जालनाच्या जाफराबाद सामाजिक वनीकरण, कार्य आयोजनाचे मंगेश शर्मा यांची शहापूर वन प्रशिक्षण संस्था, अहमदनगर सामाजिक वनीकरणचे नसीबखान सिंगल यांची खुलताबाद इथे अशा बदल्या करण्यात आल्या आहेत. मात्र, त्यामुळे रिक्त झालेल्या जागांवर नियुक्तीसाठी अद्याप नावे ठरलेली नाहीत.

दरम्यान, सिन्नर प्रादेशिकचे प्रवीण सोनवणे, दिंडोरीचे गणेश गांगोर्डे, इगतपुरी सामाजिक वनीकरणचे अरुण सोनवणे, नाशिक सामाजिक वनीकरणचे प्रदीप कदम यांची वृत्तस्तरावरून बदली निर्देशित असली, तरी त्यांच्या नियुक्तीची ठिकाणे निश्चित झालेली नाहीत.

**सूत्र** – 'त्र्यंबकेश्वर वनक्षेत्राला आता रखवालदार', maharashtratimes.com, ०७.०८.२०२१.

### वन्यजीव गुन्हे प्रकरणांतील न्यायालयीन आदेशांचा डेटाबेस मोबाईल एप्लिकेशनवर

वाइल्डलाईफ कॉन्झर्वेशन ट्रस्ट - WCT या स्वयंसेवी संस्थेने 'वाइल्डलाईफ जज्जमेंट्स डेटाबेस' नावाचे एन्ड्रॉइड फोनवर वापरता येण्याजोगे एप्लिकेशन विकसित केले आहे. या डेटाबेसमध्ये वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ अंतर्गत नोंदवण्यात आलेल्या गुन्ह्यांच्या प्रकरणांमध्ये न्यायालयांनी दिलेल्या आदेशांचे संकलन केले आहे. त्यात राज्यातील जिल्हा न्यायालये व मुंबई उच्च न्यायालयातील ५२९ आदेशांचा समावेश आहे. ही माहिती इंग्रजी आणि मराठी या दोन्ही भाषांमध्ये देण्यात आली आहे. वापरकर्त्याला हवी ती नेमकी माहिती हुडकून काढता यावी याकरता एप्लिकेशन शोध घेण्याची सोपी सुविधा देण्यात आली आहे.

नमुन्यादाखल

| |
|---|
| प्राण्याचा प्रकार – बिबट्या/वाघ/मांडूळ… |
| स्थळ –जिल्हा न्यायालय अकोला/अमरावती/ठाणे… |
| गुन्हयाची रीत – शिकार/विदयुतप्रवाह/सापळे… |
| जप्ती साहित्य – मृगया चिन्हे/बंधक प्राणी/मांस… |
| अनुसूची – I/II/III/IV |
| कलम – 9/26/30/31… |

हे एप्लिकेशन गुगल प्ले स्टोअरवर (https://play.google.com/store/apps/details?id=com.digitalspace.wct) मोफत डाउनलोड करता येईल. निकालाची प्रत प्राप्त झाल्यावर ती सहजपणे वापरकर्त्याला स्वतःच्या फोनद्वारे एप्लिकेशन संग्रहित करता येईल किंवा इतर वापरकर्त्यांमध्ये वितरीत करता येईल अशी या एप्लिकेशनची रचना आहे. या आधारे वनाधिकाऱ्यांना तपासात मदत होईल, अशी अपेक्षा WCT ने व्यक्त केली आहे.

तसेच, हे न्यायालयीन आदेश https://court.mah.nic.in/courtweb/index_eng.php# या संकेतस्थळावर जनतेसाठी खुले आहेत. न्यायालयीन आदेश हे सार्वजनिक दस्तऐवज असतात त्यामुळे त्याची मांडणी ही कॉपीराईटचे उल्लंघन करणारी ठरत नाही, असे WCT ने जाहीर केलेल्या माहितीपत्रकात म्हटले आहे.

**सूत्र** - वाइल्डलाईफ कॉन्झर्वेशन ट्रस्ट या संस्थेने जाहीर केलेले माहितीपत्रक, ०६.०९.२०२१.

## पश्चिम महाराष्ट्र

### सातारा जिल्ह्यातील कराड इथून दोघांना पकडले; वाघ, बिबट्याची ११ नखे सापडली

कराड इथे ऑगस्ट महिन्यात वाघ व बिबट्यांच्या नखांची विक्री करणाऱ्या दोघा तरुणांकडून वन विभागाने ११ नखे जप्त केली आणि दोघा आरोपींची चार दिवसांच्या वन कोठडीत रवानगी केली. या प्रकरणात आंतरराज्यीय टोळीचा सहभाग असल्याची शक्यता आहे. खेरीज, या

गुन्ह्यामुळे वाघ व बिबट्याची शिकार झाल्याचेही उघड झाले आहे.

**सूत्र** - 'वाघ, बिबट्याची ११ नखे जप्त; कराडमध्ये दोघांना वन कोठडी', www.loksatta.com, १८.०८.२०२१.

### आजरा, चंदगड तालुक्यांत हत्ती शेतांमध्ये शिरल्यामुळे पिकांचे नुकसान



कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा व गडहिंग्लज तालुक्यांमधील अनेक गावांत दिवसभर फिरणाऱ्या हत्तीमुळे शेतीचे मोठे नुकसान झाले.

जुलै-ऑगस्ट महिन्यातील महापुरात गडहिंग्लज तालुक्यातील पश्चिम भागातील एक हत्ती पूर्व भागात आला. या भागात दोन हत्तींचे वास्तव्य आहे. महापुराचे पाणी ओसरल्यानंतर एक हत्ती पूर्व भागात तर दुसरा पश्चिम भागात गेला.

या दोहोंपैकी एक हत्ती आजरा-चंदगड रस्त्यावरील गावांमध्ये शिरला. हत्ती पाहण्यासाठी ग्रामस्थांची गर्दी आणि गर्दी पांगवण्यासाठी वन विभागाची धडपड यामुळे पुढे हत्ती आणि मागे ग्रामस्थ असा प्रकार बराच वेळ सुरू होता. त्यात हत्ती इकडेतिकडे पळू लागल्याने बऱ्याच ठिकाणी भात व इतर पिकांचे मोठे नुकसान झाले.

वन विभागाच्या कर्मचाऱ्यांची मोठी फौज हत्तीला जंगलाच्या दिशेने हुसकावून लावण्यासाठी प्रयत्नशील होती. संध्याकाळी त्या प्रयत्नांना यश आले आणि हा हत्ती हिरण्यकेशी नदीतून अखेर जंगलात गेला.

**सूत्र** - गुरुबाळ माळी. 'वाट चुकलेला हत्ती गावात शिरला आणि...; पुढे काय झाले पाहा!', maharashtratimes.com, ०९.०८.२०२१.

## <u>विदर्भ</u>

### गडचिरोली जिल्ह्यात यंदा आठ महिन्यांत वाघाच्या हल्ल्यांत १५ ग्रामस्थ ठार

गडचिरोली जिल्ह्यात माणूस-वाघ संघर्ष तीव्रता सातत्याने वाढत आहे (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड २ अंक ३ क्र. ६*). जिल्ह्यात वाघाच्या हल्ल्याच्या घटनांमध्ये वाढ झाली असून यंदा आठ महिन्यांत १५ ग्रामस्थांचा त्यात बळी गेला आहे. त्यामुळे वाघाला ठार मारा किंवा जेरबंद करा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

वडसा वन विभाग आणि गडचिरोलीच्या वनव्याप्त कार्यक्षेत्रात व शेतालगत जवळपास १५ ग्रामस्थांचा वाघाच्या हल्ल्यांमध्ये मृत्यू झाला; तर अनेक जण जखमी झाले. सुमारे ५०-६० पाळीव जनावरेही वाघाने ठार केली. गडचिरोली तालुक्यातील आंबेशिवणी, आंबेटोला, भिकरमौशी, खुर्सा, गिलगाव, मुरमाडी, अमीरझा, मौशीखांब, टेंभा, चंबर्डा, धुंडाशिवनी, राजगाटा चाक, उसगाव, जेपरा आदी गावांच्या परिसरात गेल्या काही महिन्यांपासून वाघाची दहशत आहे.

पंधरा गावांतील धास्तावलेल्या नागरिकांनी एक सप्टेंबर रोजी गडचिरोली इथे वन विभागाच्या मुख्य वनसंरक्षक कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन केले. आदोलकांना राजकीय संघटना व पक्षाचाही पाठींबा आहे. वाघाला जेरबंद करा किंवा ठार मारा, या मुख्य मागणीसह वाघ, बिबटे व अन्य वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात ठार झालेल्यांच्या कुटुंबातील एकाला तात्काळ वन विभागात नोकरी द्यावी, मृताच्या कुटुंबाला व जखमींना आर्थिक मदत द्यावी, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पर्यटनाचे व्यापारीकरण (हॉटेल, रिसॉर्टना बेसुमार परवानग्या देणे) थांबवावे, वन्यजीवांना होणारा त्रास थांबवण्यावर

उपाययोजना कराव्यात, अशा मागण्या आंदोलकांनी केल्या.

कोरची, धानोरा, एट्टापल्ली, भामरागड, मुलचेरा, अहेरी, सिरोंचा तालुक्यात वाघ, बिबटे आणि अन्य वन्य प्राणी मोठ्या संख्येने आहेत. कोरची आणि एट्टापल्ली तालुक्यांतील १४,९५० हेक्टर जंगल क्षेत्रातील मंजूर आणि प्रस्तावित लोह खाणी ताबडतोब रद्द कराव्यात, अशीही आंदोलकांची मागणी आहे.

दरम्यान, या वाघाला पकडण्यासाठी १२ गावांमध्ये मोहीम राबवण्यात येत आहे. पोर्ला वनपरिक्षेत्रात ५० स्वयंचलित कॅमेरे लावण्यात आले आहेत. एकूण २४ कर्मचारी, दोन नेमबाज कार्यरत आहेत. राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरण - NTCAनेही वाघाला जेरबंद करण्यासाठी दोन पथके पाठवली आहेत.

**सूत्र** - 'गडचिरोली जिल्ह्यात मानव-वन्यजीव संघर्ष तीव्र', www.loksatta.com, १७.०९.२०२१. 'गडचिरोली जिल्ह्यात हल्लेखोर वाघाचा धुमाकूळ; ११ जणांचा मृत्यू', maharashtratimes.com, ०२.०९.२०२१.

### चंद्रपूर जिल्ह्यात माणूस-वाघ संघर्षाची तीव्रता कायम




चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपुरी वन विभागात माणूस-वाघ संघर्षाची तीव्रता कायम आहे (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड २ अंक ३ क्र. ६, महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड २ अंक २ क्र. ५*). या वन विभागांतर्गत एकूण ४०० गावे जंगलालगत वा जंगलाजवळ आहेत. या परिसरात ८५ वाघ असून आजतागायत ५१ गावांत वाघांचे हल्ले झाले आहेत. त्या व्यतिरिक्त २० पेक्षा जास्त बछडे आहेत. वाघांएवढीच बिबट्यांचीही संख्या आहे. त्यामुळे वाघ-बिबट्यांच्या नियमित हालचाली गावालगत अनेक वेळा दिसून आल्या आहेत. काही वेळा गावात शिरून गावकऱ्यांवर हल्ल्याच्या घटना देखील घडल्या आहेत.

ब्रम्हपुरी वन विभागातील माणूस-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी वन विभागाने ठोस उपाययोजना कराव्यात, असे निर्देश चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिले आहेत. वाघांच्या वाढत्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर ब्रम्हपुरी वन विभागाच्या ऑगस्ट महिन्यात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी वरिष्ठ वनाधिकाऱ्यांसह, जिल्हा प्रशासनाचे इतर अधिकारीही उपस्थित होते. डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेंतर्गत प्रत्येक गावातील शेतीला सौर कुंपण घालणे, गावाला योग्य ते कुंपण घालणे, जंगलाला लागून असलेल्या शेतावर जाऊ नये म्हणून मोबदला रुपात १० हजार रुपयांची मदत करणे, श्यामाप्रसाद मुखर्जी योजनेची व्याप्ती वाढवून अतिरिक्त १५० गावात ही योजना प्रभावीपणे राबवणे, जवळ आलेल्या वाघाला पळवण्यासाठी विशेष काठी खरेदी करणे आदी उपाययोजनांकरता निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे पालकमंत्र्यांनी सांगितले.

ब्रह्मपुरी वन विभागाने ६२ गावांना जाळीचे कुंपण घालण्यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजनेअंतर्गत ५० कोटी रुपयांची तरतूद असलेला प्रस्ताव तयार करून पाठवला आहे, असे वनाधिकाऱ्यांनी सांगितले. या कुंपणामुळे वाघ-बिबटे गावात प्रवेश करू शकणार नाहीत. तसेच, गावातील लोकांना त्यांनी कुठपर्यंत जाणे सुरक्षित आहे, याचा अंदाज येईल तसेच माणूस-वन्यजीव संघर्षाप्रसंगी वन विभागाचे पथक घटनास्थळी पोहचेपर्यंत वेळ जात असल्यामुळे गावातच ताबडतोब उपाययोजना करण्याच्या दृष्टीने सुमारे १०० गावांमध्ये प्राथमिक प्रतिसाद पथके नेमण्यात आली आहेत.


दरम्यान, ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात भद्रावती तालुक्यातील मांगलीजवळील वन

विकास महामंडळाच्या मामला वनपरिक्षेत्रात वाघाच्या हल्ल्यात गुराखी ठार झाला. या घटनेने चंद्रपूर जिल्ह्यात चालू वर्षात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात ठार झालेल्यांची संख्या ३० झाली. यातील २६ हल्ले वाघाने, तीन बिबट्याने तर एक हल्ला हत्तीने केला आहे.

मागील सात वर्षांत माणूस-वन्यजीव संघर्षात राज्यात वन्य प्राण्यांच्या हल्यात ३९४ गावकऱ्यांचा बळी गेला आहे. यात सर्वाधिक ८८ बळी हे २०२० या वर्षातील आहेत.

**सूत्र** – सुनील तांबे. 'इथे वाढतोय वन्यजीव-मानव संघर्ष; ठोस उपाययोजना करण्याचे सरकारचे निर्देश', maharashtratimes.com,२१.०८.२०२१.
'मानव-वन्यजीवांत संघर्षवाढ; सात महिन्यात 'इतक्या' जणांचे बळी', maharashtratimes.com, ०६.०८.२०२१.
पंकज मोहरीर. 'वाघांच्या दहशतीत ४०० गावे', maharashtratimes.com, ०२.०८.२०२१.

### नागपूर वन विभागाच्या व्याघ्र तस्करीविरोधी मोहिमेत २९ आरोपींना अटक



नागपूर वन विभागाच्या विशेष पथकाने १० सप्टेंबर रोजी घातलेल्या दोन छाप्यांमध्ये वाघाच्या विविध अवयवांसह सात आरोपींना अटक केली. आरोपींकडून वाघनखे, मिशा यांसह इतर अवयव जप्त केले आहेत. वाघाच्या अवयवांची तस्करी करणाऱ्या आरोपींविरोधात २९ जुलैपासून विभागाने मोहीम हाती घेतली आहे. तीत ऑगस्ट-सप्टेंबरमधील दीड महिन्याच्या कालावधीत २९ आरोपींना अटक केली आहे.

वन विभागाने १० सप्टेंबर रोजी सीतापूर इथल्या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्या घराच्या झडतीत वाघाचे एक नख आणि हाडाचे तीन तुकडे मिळाले. दोन्ही आरोपींना १६ सप्टेंबरपर्यंत वन कोठडी देण्यात आली. या प्रकरणाशी संबंधित इतर आरोपी फरार आहेत.

त्याच रात्री वन विभागाने बुटीबोरी वन परिक्षेत्रातील बोरखेडी टोलनाका इथून सहा नखे व वाघाच्या मिशांच्या १३ केसांसह तीन आरोपींना पकडले. वाघाच्या अवयवांची विक्री आणि तस्करीत ते सहभागी असल्याचे वन विभागाने सांगितले. त्यांच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीच्या आधारे आणखी दोन आरोपींना पकडून त्यांच्याकडून वाघाची चार किलो हाडे, मिशा व दात जप्त केले आहेत. या सर्व आरोपींवर वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

**सूत्र** – 'वाघनखे, मिशांसह पकडले आरोपी', maharashtratimes.com, ११.०९.२०२१.

### अवनी वाघीण मृत्यू प्रकरण: शिकाऱ्याचा शस्त्र परवाना बनावट असल्याचा आरोप



अवनी वाघिणीच्या मृत्यूचा (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड २ अंक २ क्र.* ५) पुन्हा तपास व्हावा, यासाठी विशेष तपास पथक गठीत करावे, अशी मागणी करणारी जनहित याचिका 'अर्थ ब्रिगेड फाउंडेशन'च्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आली. अवनीची शिकार करणाऱ्या शफत अली खान असगर अली खान यांचा शस्त्र परवाना बनावट असून घटनास्थळी पुरावे नष्ट करण्यात आल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे.

याचिकाकर्त्यांनी खानचे शस्त्र बॅलिस्टिक तपासासाठी पाठवण्याचे आदेश देण्याची विनंती

न्यायालयाकडे केली आहे. वाघिणीची बेकायदा शिकार केल्यामुळे शिकारी खान याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा, बनावट शस्त्र परवाना बाळगणे, पुराव्याशी छेडछाड करणे, कामात हयगय करणे यासाठी वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत कारवाई करावी, अशा मागण्या केल्या आहेत.

**सूत्र** – 'अवनी वाघीण मृत्यूप्रकरण; शिकाऱ्याच्या शस्त्राचा परवाना बनावट असल्याचा आरोप', maharashtratimes.com, १९.०८.२०२१.

### वाशीम जिल्ह्यात वन्य प्राण्यांमुळे शेतीचे नुकसान; विजेच्या धक्क्याने चार नीलगायी ठार

वाशीम जिल्ह्यात वन्य प्राण्यांमुळे होणाऱ्या शेतीच्या नुकसानामुळे शेतकरी हतबल झाला आहे. नीलगायींचे कळप पिके फस्त करत आहेत.

मानोरा तालुक्यात जंगलालगतच्या भागातील शेकडो एकर जमीन रिकामी झाली आहे. उमरी परिसर या नीलगायींनी फस्त केला आहे. रिसोड तालुक्यातील भोकरखेडा, गणेशपूर, कुऱ्हा, मांडवा, मंगरुळपीर तालुक्यातील आसेगाव परिसरात नीलगायी पीक नष्ट करत आहेत.

नीलगाय व माकडाचा बंदोबस्त झाला नाही, तर काही वर्षांत पेरणीसाठी जमीनच उरणार नाही अशी भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. वनविभागाने याकडे लक्ष देऊन वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

नीलगाय व इतर वन्यप्राण्यांकडून होणारे नुकसान व वन विभागाकडून मिळणारी नुकसानभरपाई यामध्ये खूप फरक आहे. नुकसानभरपाई ही पेरणीच्या खर्चाच्या आधारे दिली जाते. उत्पन्नाचा आधार ग्राह्य धरण्यात येत नाही. त्यामुळे नुकसानभरपाई मिळाली, तरी ती अत्यल्प असते.

दरम्यान, मालेगाव वनपरिक्षेत्रातील सुकांडा शेतशिवारात विजेच्या धक्क्याने चार नीलगायींचा मृत्यू झाला. लोंबकळत असलेल्या तारांची वेळेवर दुरुस्ती न केल्यामुळे हा अपघात झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

घटनास्थळावरून विजेच्या मुख्य प्रवाहाची तार गेली असून, गेल्या दीड वर्षांपासून त्या तारेचे दोन खांब खाली वाकून तारा लोंबकळलेल्या आहेत. त्याच्या दुरुस्तीची मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी वीज वितरण कंपनीच्या स्थानिक कर्मचाऱ्यांसह वरिष्ठांना अनेकदा केल्याचे शेतकऱ्यांसह माजी पंचायत समिती सदस्यानेही सांगितले. वीज वितरण कंपनी त्याची दखल अद्याप घेतलेली नाही.

**सूत्र** – 'विजेच्या धक्क्याने चार नीलगायींचा मृत्यू, दुर्गंधीमुळे घटना उघडकीस', www.esakal.com, १९.०८.२०२१.
'वन्यप्राण्यांच्या हैदोसाने गावे झाली कुलूपबंद! शेकडो जमीन पडीक', www.esakal.com, २८.०७.२०२१.



## कोकण

### सावंतवाडी, दोडामार्ग तालुक्यांत पहिल्या सर्वेक्षणात वन्य प्राण्यांच्या दुर्मीळ जातींसह १९ जातींची नोंद

मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी आणि दोडामार्ग तालुक्यांना पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र घोषित करण्यासाठी भारतीय वन्यजीव संस्था – WIIने केलेल्या पहिल्या सर्वेक्षणात वन्य प्राण्यांच्या १९ जातींची नोंद करण्यात आली आहे. यामध्ये स्ट्राईप-नेक्ड मुंगूस, रस्टी स्पॉटेड कॅट, पिसुरी (माऊस डिअर), खवलेमांजर आदी दुर्मीळ जातींचा समावेश आहे.

सह्याद्रीतील पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रासंदर्भात स्थापन केलेल्या गाडगीळ अभ्यास समितीने सावंतवाडी, दोडामार्ग तालुक्यांना संवेदनशील क्षेत्र म्हणून जाहीर करण्याची शिफारस केली होती. या शिफारसीसंदर्भात निर्णय न झाल्याने मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. (पाहा *महाराष्ट्र संरक्षित क्षेत्र वार्तापत्र खंड १ अंक ३ क्र. ३*) याचिकेत सावंतवाडी, दोडामार्ग तालुक्यांत खाणकाम व वृक्षतोडीवर बंदी आणून हा परिसर पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र म्हणून जाहीर करण्याची मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात न्यायालयाने महाराष्ट्र वन विभागाला या दोन तालुक्यांची पर्यावरणीय स्थिती आणि इथल्या गावांमधील वन्यजीवांच्या अधिवासासंदर्भात सर्वेक्षण करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार वन विभागाने सर्वेक्षणाचे काम WII या संस्थेला दिले. या अभ्यासासाठी ८१ लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे.

WIIच्या संशोधकांनी मार्च ते जून २०२१ या काळात सावंतवाडी आणि दोडामार्ग तालुक्यांमध्ये पहिले उन्हाळी सर्वेक्षण पूर्ण केले आहे. ऑक्टोबर महिन्यात या अभ्यासातील हिवाळी सर्वेक्षणाचे काम सुरू होईल.

गाडगीळ समितीने सावंतवाडी तालुक्यातील १५ आणि दोडामार्ग तालुक्यातील १० गावांचा समावेश पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्रात करण्याची मागणी केली होती. WII सावंतवाडीतील १० व दोडामार्गमधील सर्व गावांमध्ये सर्वेक्षणाचे काम करत आहे.

सावंतवाडी आणि दोडामार्ग तालुक्यांत मोठ्या प्रमाणात सुरू असलेली वृक्षतोड आणि अननस, रबर लागवडीखाली जाणाऱ्या खासगी जंगलक्षेत्रावर बंदी घालण्यासाठी पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्राची घोषणा आवश्यक मानली जात आहे.

**सूत्र** - अक्षय मांडवकर. 'सावंतवाडी-दोडामार्ग इको सेन्सटिव्ह झोन प्रकरण; 'डब्लूआयआय'ने केली १९ प्रजातींची नोंद', www.mahamtb.com, २६.०९.२०२१.

### आंबोली इथे बुरशीच्या जातीची प्रथमच नोंद

महाराष्ट्राच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली इथे परजीवी प्रकारातील बुरशीची *Meliola phyllostachydis* var. microspora (मेलिओला फायलोस्टॅकिडिस वरायटी मायक्रोस्पोरा) ही जाती प्रथमच आढळली आहे. यापूर्वीची या जातीची नोंद भारतातील केरळ राज्यात झाली होती. 'ब्लॅक माइल्ड्यू' प्रकारातील ही बुरशी साधारणपणे दाट जंगलामधील झाडांच्या पानांवर, खोडांवर आढळून येते.

गेल्या दोन वर्षांपासून रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील वन्य वनस्पतींवर वाढणाऱ्या बुरशीचा अभ्यास करत असलेले संशोधक विद्यार्थी प्रतिक नाटेकर यांना ही जाती दिसून आली आहे. नाटेकर हे सध्या शिवाजी विद्यापीठांतर्गत इचलकरंजी इथल्या संस्थेत संशोधक विद्यार्थी म्हणून कार्यरत आहेत. या संशोधनासाठी त्यांना डॉ. चंद्रहास पाटील आणि डॉ. अंजली पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. नाटेकर यांचा या विषयीचा शोधनिबंध 'कल्याण भारती' (UGC-CARE LIST Group I) या शोधपत्रिकेत प्रकाशित झाला आहे.

**सूत्र** – प्रतिक नाटेकर यांचे ई-पत्र, २०.१०.२०२१.



## मुंबई महानगर प्रदेश

### नवी मुंबईतील खारघर खाडीत दुर्मीळ 'स्मूथ-कोटेड ऑटर'च्या जोडीचे दर्शन

स्मूथ-कोटेड ऑटर – याला मराठीत उदमांजर असे म्हणतात – हा प्राणी नवी मुंबईतील खारघर इथे खाडीत दिसून आला आहे. एस. रामप्रसाद आणि संजीव बलसारा या दोघा

पक्षीनिरीक्षकांनी १३ ऑगस्ट रोजी खारघर खाडीत दिसलेल्या ऑटरच्या जोडीची छायाचित्रे काढली आणि 'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' या संस्थेतील संशोधकांकडून हा प्राणी स्मूथ-कोटेड ऑटर असल्याची खात्री करून घेतली.


या उदमांजराची नोंद रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये या पूर्वी झालेली आहे. वर्ष २०१७ मध्ये राज्याचा कांदळवन विभाग आणि पुण्यातील स्वयंसेवी संस्था इला फाउण्डेशन यांनी एकत्रित येऊन केलेल्या शिरगणतीत महाराष्ट्राच्या किनारी भागात जवळपास ५०० उदमांजरे आढळली होती. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १२ खाड्यांमध्ये त्यांची संख्या ४३७ ते ५९१ दरम्यान असल्याचे स्पष्ट झाले होते. २०१९ या वर्षात रायगड जिल्ह्यातील रोहे इथे या उदमांजराची जोडी दिसून आली होती.

मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील खारघर खाडीसह २० ठिकाणी जैवविविधतेच्या संरक्षणासाठी आराखडा अस्तित्त्वात यावा, याकरता नवी मुंबई स्थित स्वयंसेवी संस्था 'नॅटकनेक्ट फाउण्डेशन' पाठपुरावा करत आहे. खारघर खाडीत स्मूथ-कोटेड ऑटरचे अस्तित्त्व आढळून आल्यामुळे जैवविविधता संरक्षण आराखड्याची गरज अधोरेखित झाल्याचे संस्थेच्या प्रतिनिधीने म्हटले आहे. इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झर्वेशन ऑफ नेचर - IUCNच्या प्राण्यांच्या अस्तित्त्वाला धोका असलेल्या रेड लिस्टमध्ये स्मूथ-कोटेड ऑटरचा समावेश अस्तित्त्वाला धोका निर्माण होण्याची शक्यता असलेल्या गटात आहे.

**सूत्र** – प्रयाग अरोरा-देसाई. 'Smooth-coated otters spotted in Kharghar creek in Navi Mumbai', www.hindustantimes.com, १३.०८.२०२१.

## माणूस-बिबट्या संघर्ष

### राज्यातील ६५ टक्के बिबटे संरक्षित क्षेत्र व राखीव वनांच्या बाहेर; मानवी वसाहतींजवळ वावर वाढला



राज्यात आढळणाऱ्या बिबट्यांपैकी ६५ टक्के बिबटे अभयारण्ये, राष्ट्रीय उद्याने आणि राखीव वनांऐवजी मानवी वसाहतींजवळ राहत आहेत. 'स्टेटस ऑफ लेपर्ड इन इंडिया २०१८' या अहवालानुसार देशातील बिबट्यांच्या संख्येत गेल्या १० वर्षांत ६० टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे (संबंधित वृत्त पान क्र. २२ वर).

पुणे जिल्ह्यातील लहान-मोठ्या गावांबरोबरच शहराच्या हद्दीलगत त्यांचा वावर वाढला आहे. कोविड-१९शी संबंधित टाळेबंदीपासून पुणे शहरातील उपनगरांमध्ये सातत्याने बिबट्या दिसत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. मुंबईतील बोरीवली, गोरेगाव उपनगरांमधील निवासी संकुलांमध्ये सर्रास बिबटे दिसू लागले आहेत.

सार्वजनिक अस्वच्छता आणि भटक्या प्राण्यांमुळे बिबटे शहरांच्या हद्दीलगत येण्याचे प्रमाण वाढत असल्याचे वनाधिकाऱ्यांनी म्हटले आहे.

**सूत्र** - चैत्राली चांदोरकर. 'बिबट्या वेशीवर', maharashtratimes.com, ०४.०९.२०२१.

माणूस-बिबट्या संक्षिप्त वृत्त

| जिल्हा | तालुका | घटना | सूत्र |
|---|---|---|---|
| अहमदनगर | संगमनेर | पाच वर्षांच्या मुलावर बिबट्याचा हल्ला; आईने बिबट्यावर प्रतिहल्ला करून मुलाला वाचवले | ईसकाळ, ०३.०८.२०२१ |
| | | बोटा इथे शेतकऱ्याने बिबट्याला कोंडून केले जेरबंद; मात्र बिबट्याकडून पाच बोकड, तीन शेळ्या ठार | ईसकाळ, १५.०८.२०२१ |
| | | धांदरफळ खुर्द इथे अडीच वर्षांची मुलगी बिबट्याच्या हल्ल्यात ठार | ईसकाळ, २५.०८.२०२१ |
| चंद्रपूर | सावली | व्याहाड खुर्द वनपरिक्षेत्रातील शेतात मृत बिबट्या आढळला | महाराष्ट्र टाइम्स, १२.०९.२०२१ |
| | ब्रह्मपुरी | सिंदेवाही वनपरिक्षेत्रात जाटलापूर गावाजवळ बिबट्याचे दोन मृत बछडे आढळले | महाराष्ट्र टाइम्स, ०५.०८.२०२१ |
| धुळे | धुळे | नेर परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात वासरू ठार; पाळीव जनावरांवर हल्ल्याच्या घटनांमध्ये वाढ | ईसकाळ, १८.०८.२०२१ |
| मुंबई उपनगर | - | आरे दुग्धवसाहतीत १४ वर्षीय मुलावर बिबट्याचा हल्ला; महिन्याभरातील आठवी घटना | इंडियन एक्स्प्रेस, ०९.१०.२०२१ |
| सातारा | कराड | विंग व भोवतालच्या परिसरात पाळीव जनावरांवर बिबट्यांचे हल्ले कायम | ईसकाळ, २१.०९.२०२१ |
| | | दक्षिण तांबवे इथे सात वर्षांच्या मुलावर बिबट्याचा हल्ला | ईसकाळ, ०९.०९.२०२१ |
| | | बेलवडे बुद्रुक शिवारात मृत बिबट्या आढळला | ईसकाळ, २५.०८.२०२१ |
| | खंडाळा | मांढरदेवी वनक्षेत्रालगतच्या गावांमध्ये बिबट्याची दहशत; हल्ल्यात अनेक पाळीव जनावरे ठार | ईसकाळ, २०.०९.२०२१ |
| | पाटण | ढेबेवाडी इथे दिवसाउजेडी शेतकऱ्यांसमोर बिबट्याचा शेळीवर हल्ला | ईसकाळ, १८.०८.२०२१ |

## राष्ट्रीय बातम्या

**संरक्षित क्षेत्रे, संवेदनशील पर्यावरण क्षेत्रे आणि वन्यजीव संचारमार्गांत येणाऱ्या प्रकल्पांवर खर्चाच्या दोन टक्के कर आकारणीचा राष्ट्रीय वन्यजीव मंडळाचा निर्णय**

संरक्षित क्षेत्र, संवेदनशील पर्यावरण क्षेत्र आणि वन्यजीव संचारमार्गात उभारल्या जाणाऱ्या प्रकल्पावर त्याच्या खर्चाच्या दोन टक्के कर लागू करण्याचा निर्णय राष्ट्रीय वन्यजीव मंडळ – NBWLच्या स्थायी समितीने घेतला आहे. प्रकल्प विकासकांकडून हा कर घेतला जाणार असून त्यातून प्रकल्प असलेल्या क्षेत्रात वन्यजीवांवर प्रकल्पामुळे होणारे दुष्परिणाम कमी करण्यासाठी उपाययोजना केल्या जातील.

NBWLच्या ७ ऑगस्ट रोजी झालेल्या ६४ व्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. मात्र, वन्यजीव विषयातील तज्ज्ञांनी या निर्णयाबाबत नाराजी व्यक्त केली आहे. प्रकल्पांमुळे वन्य अधिवासाचे तुकडे पडतात व त्यातून परिसंस्थांवर गंभीर दुष्परिणाम होतात हे लक्षात घेता केवळ दोन टक्के आकारून प्रकल्पांना परवानगी देण्याचे समर्थन NBWL करू पाहात आहे, असे 'वाइल्डलाईफ फर्स्ट' या संस्थेचे विश्वस्त प्रवीण भार्गव यांनी म्हटले आहे. NBWLचे माजी सदस्य असलेल्या भार्गव यांनी सांगितले की करामुळे मिळणाऱ्या अतिरिक्त निधीतून उपाययोजनांच्या नावाखाली मोठ्या यंत्रांच्या साहाय्याने

जमिनीची उलथापालथ करून विविध प्रकारची बांधकामे केली जातील. भरपाईदाखल वनीकरणासाठी निधी योजना - CAMPA अंतर्गत ५०,००० कोटी रुपयांचा निधी सरकारने दिल्यापासून अशा कथित उपाययोजनांचे दुष्परिणाम वन्य अधिवासांवर दिसून येत असल्याकडे भार्गव यांनी लक्ष वेधले. त्याचवेळी, 'गीर फाउण्डेशन' या संस्थेने कर आकारणीसाठी मार्गदर्शक सूचना असाव्यात, त्यातून मिळालेला निधी CAMPA मध्ये जावा आणि तो उपाययोजनांवर खर्च करण्यासाठी वार्षिक योजना तयार केल्या जाव्यात अशी सूचना केली आहे.

NBWLचे आणखी एक माजी सदस्य किशोर रीठे यांनी सांगितले की NBWLचा हा निर्णय जुनाच आहे. हा निर्णय २०१२-१३ या वर्षात रीठे मंडळावर असताना झालेला असून महाराष्ट्र राज्याचे वन्यजीव मंडळ २०१४ पासून त्यानुसार कर आकारणी करत आहे. NBWLच्या स्थायी समितीने आता संरक्षित क्षेत्रे, संवेदनशील पर्यावरण क्षेत्रे व वन्यजीव संचारमार्गांत प्रकल्पांच्या उभारणीला रोखण्यासाठी जास्त म्हणजे पाच ते सात टक्के या दराने कर लागू केला पाहिजे.

राज्य व केंद्रशासित प्रदेश वन्यजीव अधिवासात उपाययोजनांसाठी वेगवेगळ्या दराने कर आकारतात. ही कर आकारणी प्रकल्पासाठी येणाऱ्या एकूण खर्चाऐवजी संरक्षित वा संवेदनशील पर्यावरण क्षेत्रातील प्रकल्पाचा भाग लक्षात घेऊन व्हावी; कर आकारणी ऐवजी प्रकल्प विकासकालाच उपाययोजनांची अंमलबजावणी करायला सांगावे अशा मागण्या पर्याय केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाकडे आल्या आहेत. मात्र, प्रकल्प विकसकाला उपाययोजनांची अंमलबजावणी करायला सांगितल्यास वन्यजीव अधिवासाच्या व्यवस्थापनात बाह्य हस्तक्षेप होईल, असे मंत्रालयातील एका अधिकाऱ्याने सांगितले.

मंत्रालयाने २२ जुलै २०१४ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार NBWLची स्थायी समिती तीन महिन्यांतून एकदा बैठक घेते. आता समितीची बैठक दर महिन्याला घेण्याचे ठरले आहे जेणेकरून प्रलंबित प्रकल्पांवर झटपट निर्णय होतील.

माजी प्रधान मुख्य वन संरक्षकांच्या मोठ्या गटाने याबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली आहे. NBWL प्रकल्पांबाबत पुरेसा अभ्यास न करता त्यांना झटपट मंजुरी देण्याच्या बेतात आहे ही दुर्दैवाची बाब असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्याचबरोबर कराची रक्कम CAMPA निधीत समाविष्ट केल्यास तिचा आता CAMPA निधीचा होत आहे तसाच गैरवापर होईल, असे मत त्यांनी व्यक्त केले. CAMPA निधीचा वापर वनीकरणाऐवजी मोठ्या यंत्रांची खरेदी व त्याद्वारे बांधकामांसाठी केला जात असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले.

**सूत्र** – विजय पिंजरकर. 'NBWL allows devpt. inside PAs and ESZs with 2% levy', www.timesofindia.indiatimes.com, २४.०८.२०२१.


## पिंजऱ्यांत जन्मलेल्या, वाढलेल्या गिधाडांचे नैसर्गिक अधिवासात यशस्वी पुनर्वसन

बंदिस्त प्रजनन केंद्रात जन्मलेल्या गिधाडांना त्यांच्या मूळ अधिवासात सोडण्याच्या प्रकल्पाचा भाग म्हणून गेल्या वर्षी हरयाणातील पिंजोर इथल्या केंद्रातून आठ तर या वर्षी पश्चिम बंगालमधील बक्सा इथल्या केंद्रातून १० गिधाडांना नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. या गिधाडांचा ठावठिकाणा कळत राहावा यासाठी त्यांच्या पाठीवर ट्रान्समीटर आणि पंखांवर रंगीत खुणा बसवण्यात आल्या असून पायात रिंग लावण्यात आल्या आहेत. त्यामुळे ही गिधाडे नैसर्गिक अधिवासात यशस्वीरित्या वावरत असल्याचे समोर आले आहे.

'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी' या बिनसरकारी संस्थेने हरयाणातील पिंजोर इथल्या गिधाड प्रजनन केंद्रापाठोपाठ २००५ मध्ये पश्चिम बंगालमधील बक्सा व्याघ्र प्रकल्पात एक, २००७ मध्ये असममधील राणी इथे आणि अलीकडेच मध्य प्रदेशमधील भोपाळ इथे एक केंद्र सुरू केले. बंदिवासात प्रजनन यशस्वी झाल्यानंतर पक्ष्याला

नैसर्गिक अधिवासात सोडणे आव्हानात्मक आहे. दीर्घ काळ बंदिवासात राहिलेल्या किंवा बंदिवासात जन्मलेल्या गिधाडांना नैसर्गिक अधिवासात सोडल्यावर त्यांना निसर्गाशी जुळवून घ्यावे लागते. त्यामुळे या प्रकल्पांतर्गत बंदिवासातील गिधाडांना सभोवतालच्या परिस्थितीचा अंदाज यावा म्हणून नैसर्गिक अधिवासात त्यांच्यासाठी मोठा पिंजरा तयार करण्यात आला. जोपर्यंत त्यांच्या पंखात नैसर्गिक अधिवासात उडण्याचे सामर्थ्य येत नाही तोपर्यंत त्यांना जवळपास खाद्य उपलब्ध करून दिले जात होते.

**सूत्र** – 'कृत्रिम प्रजनन केंद्रातील गिधाडांची यशस्वी भरारी', www.loksatta.com, २७.०८.२०२१.



**पशुंच्या आणखी एका औषधामुळे भारतातील गिधाडांच्या अस्तित्त्वाला धोका**

निमेसुलिडे या पशुंसाठी असलेल्या वेदनाशामक औषधामुळे गिधाडांचा मृत्यू होत असल्याचे एका अभ्यासात दिसून आले आहे. याबाबत शोधनिबंध 'एन्वॉयर्न्मेंटल सायन्स अँड पोल्युशन रीसर्च' या शोधनिबंध पत्रिकेत प्रकाशित झाला आहे. यापूर्वी गिधाडांच्या मृत्यूसाठी कारणीभूत झालेल्या डायक्लोफेनॅक औषधाप्रमाणेच निमेसुलिडे या औषधाचे गिधाडांवर दुष्परिणाम दिसून येतात. हे लक्षात घेऊन भारतीय उपखंडात गिधाडांचे संवर्धन करायचे असल्यास भारत सरकारने निमेसुलिडेच्या वापरावर बंदी घातली पाहिजे, असे शोधनिबंधात म्हटले आहे.

भारतात पर्यावरणातील प्रदुषकांचा परिसंस्थांवर होणाऱ्या संशोधन प्रकल्पाचा भाग म्हणून पर्यावरणीय-विषशास्त्र विभागातील तज्ञ, सलीम अली सेंटर फॉर ऑर्निथोलॉजी अँड नॅचरल हिस्ट्री - SACON व जिवदया चॅरीटेबल ट्रस्ट यांच्या सहयोगाने हा अभ्यास करण्यात आला. या प्रकल्पाला भारत सरकारचे अर्थसाहाय्य आहे.

गिधाडांबाबत हा अभ्यास व्हाईट-रम्प्ड वल्चर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गिधाडाच्या जातीवर करण्यात आला. २०१९ मध्ये दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये प्रत्येकी दोन मृत गिधाडे आढळली. शवविच्छेदनात या चारही गिधाडांचा मृत्यू निमेसुलिडे औषध देण्यात आलेली मृत गुरे खाल्ल्यानंतर झाल्याचे स्पष्ट झाले.

केंद्र सरकारने राष्ट्रीय गिधाड संवर्धन कृती आराखडा, २०२०-२५ अंतर्गत आठ गिधाड प्रजनन केंद्रे उभारली आहेत व आणखी आठ केंद्रे उभारण्याचा सरकारचा बेत आहे. मात्र, गिधाडांसाठी हानिकारक पशुवैद्यक औषधांच्या वापरावर नियंत्रण मिळवण्यात सरकारला अद्याप यश आलेले नाही. २००६ मध्ये बंदी घातल्यानंतरही डायक्लोफेनॅकच्या पशुवैद्यक वापरासाठी विक्रीचे प्रमाण १० ते ४६ टक्के आहे. तसेच, बेकायदा वापरात असलेले एसेक्लोफेनॅक हे पशुंसाठीचे औषध गुरांना दिल्यानंतर त्यांच्या शरीरात लवकरच डायक्लोफेनॅकमध्ये रुपांतरीत होते.


केम्ब्रिज विद्यापीठातील प्राध्यापक आणि सेविंग एशियाज् वल्चर्स फ्रॉम एक्स्टिंक्शन – SAVEचे अध्यक्ष ऱ्हिस ग्रीन यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की या नव्या अभ्यासाचे निष्कर्ष पाहता निमेसुलिडेचा परवाना तातडीने रद्द केला पाहिजे. SAVEच्या उपक्रमाचे भारतातील व्यवस्थापक क्रिस बोडेन यांनी सांगितले की गिधाडांच्या संख्येत घट झाल्यामुळे मृत गुरेढोरे पडून राहतात व त्या रुपात मोठ्या प्रमाणावर खाद्य उपलब्ध झाल्यामुळे भटक्या कुत्र्यांच्या संख्येत मोठी वाढ दिसून येत आहे. इथे नमूद करणे गरजेचे आहे की भारतात रेबीज या रोगामुळे दरवर्षी २०,००० मृत्यू होतात, पैकी कुत्रा चावल्यामुळे रेबीज झालेल्यांची संख्या ९६ टक्के इतकी असते.

बोडेन यांनी सांगितले की बांग्लादेश सरकारने या वर्षाच्या सुरुवातीला केटोप्रोफेन या पशुवैद्यक औषधावर घातलेली बंदी अनुकरणीय आहे. भारतातही जी औषधे गिधाडांसाठी सुरक्षित असल्याचे स्पष्ट झालेले नाही अशा औषधांवर बंदी घातली गेली पाहिजे.

डायक्लोफेनॅकमुळे १९९० च्या दशकात जवळपास ९९ टक्के गिधाडांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यापाठोपाठ एसिक्लोफेनॅक आणि केटोप्रोफेन ही औषधे गिधाडांना हानिकारक असल्याचे दिसून आले. डायक्लोफेनॅकच्या पशुवैद्यक वापरावर बंदी आहे तर एसिक्लोफेनॅक व केटोप्रोफेनवरील बंदीचा प्रस्ताव केंद्र सरकारच्या विचाराधीन आहे, अशी माहिती गिधाड संशोधक आणि बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे उपसंचालक विभू प्रकाश यांनी दिली.

**सूत्र** – विवेक गुप्ता. 'Now, another veterinary painkiller is accelerating extinction of vultures in India', www.scroll.in, १४.०७.२०२१.

### भारतात वर्ष २०२२ मध्ये प्रथमच शास्त्रीय पद्धतीने हत्तींची गणना



वर्ष २०२२ मध्ये भारतात हत्तींची गणना शास्त्रीय पद्धतीने केली जाणार आहे. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव यांनी हत्ती दिवस - १२ ऑगस्ट रोजी ही घोषणा केली. या गणनेसाठी मार्गदर्शक सूचना केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने जारी केल्या आहेत.

ही हत्ती गणना तीन टप्प्यांत होणार आहे. हत्तींच्या अधिवासात प्रत्यक्ष फिरून सर्वेक्षण, रिमोट सेन्सिंग तंत्रज्ञानाधारित माहितीचे विश्लेषण आणि स्वयंचलित कॅमेऱ्यांचा वापर गणनेसाठी केला जाणार आहे. त्याचबरोबर, हत्तींच्या विष्ठेचे जनुकीय विश्लेषणही केले जाणार आहे.

या आधी २०१७ या वर्षात देशात हत्तीगणना झाली होती. त्या गणनेत देशात २७,००० पेक्षा जास्त हत्ती असल्याचे दिसून आले होते. मात्र, त्या गणनेसाठी वापरलेल्या पद्धती शास्त्रीय नव्हत्या त्यामुळे तो केवळ हत्तींच्या संख्येचा ठोकताळा म्हणता येईल. पुढच्या वर्षी होणाऱ्या गणनेकरता वाघ आणि बिबट्यांची ज्या शास्त्रशुध्द पद्धतींनी गणना केली जाते त्या पद्धतींचा वापर केला जाणार आहे, असे राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाचे सदस्य सचिव आणि केंद्रीय प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाचे प्रमुख एस पी यादव यांनी सांगितले.

२०१७ मधील गणना ही संपूर्ण देशात एकाच वेळी करण्यात आली होती. त्यामध्ये उत्तराखंड, उत्तर प्रदेश, हरयाणा, हिमाचल प्रदेश, ओदिशा, झारखंड, बिहार, बंगालचे उत्तर व दक्षिण भाग, छत्तीसगढ, असम, अरुणाचल प्रदेश, मेघालय, नागालँड, त्रिपुरा, मिझोरम, मणिपूर, कर्नाटक, केरळ, तमिळ नाडू, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र या राज्यांसह अंदमान व निकोबार बेटांवर हत्तींचे अस्तित्त्व असल्याचे दिसून आले होते. या गणनेत हत्तींची संख्या वर्ष २०१२ मध्ये झालेल्या गणनेतील संख्येपेक्षा कमी असल्याचे अहवालात म्हटले होते. २०१२ च्या गणनेनुसार देशात २९,३९१ ते ३०,७११च्या दरम्यान हत्तींची संख्या होती. मात्र, तज्ज्ञांच्या मते या दोन गणनांची तुलना करणे योग्य ठरणार नाही कारण २०१२ च्या गणनेकरता वेगवेगळ्या राज्यांनी वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब केला होता.

दरम्यान, लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, वर्ष २०२० मध्ये माणूस-हत्ती संघर्षात ८७ हत्ती व ३५९ माणसे ठार झाली; २०१९-२० या काळात १९ हत्ती व ५८५ माणसे मृत्युमुखी पडली.

**सूत्र** - 'India to conduct first scientific estimation of its elephant population in 2022', www.firstpost.com, १८.०८.२०२१.

## देशात बिबट्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर; सर्वाधिक बिबटे मध्य प्रदेशात

देशात बिबट्यांची सर्वाधिक संख्या असलेल्या राज्यांमध्ये महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. राज्यात १,६९० बिबटे आहेत. या क्रमवारीत ३,४२१ बिबट्यांसह मध्य प्रदेश पहिल्या आणि १,७८३ बिबट्यांसह कर्नाटक दुसऱ्या क्रमांकावर आहे.

'स्टेटस ऑफ लेपर्ड्स, को-प्रिडेटर्स एण्ड मेगा-हर्बिवोर्स इन इंडिया, २०१८' हा अहवाल भारतीय वन्यजीव संस्था - WIIने जुलैअखेरीस प्रकाशित केला. त्यामध्ये ही आकडेवारी दिली आहे. देशातील व्याघ्र प्रकल्पांमध्ये १२,८५२ बिबटे असल्याचे या अहवालात म्हटले आहे.

**सूत्र** – अमित एस उपाध्ये. 'Karnataka records second highest leopard population in country', www.newindiaexpress.com, ०२.०८.२०२१.

## आंतरराष्ट्रीय बातम्या

## ईशान्य चीनमधील चार भूप्रदेशांमध्ये वाघांना सुयोग्य अधिवासः एका अभ्यासाचा निष्कर्ष

चीनच्या ईशान्य भागातील चार महत्त्वाच्या – लाओयेलिंग, झांग-गुआंगकैलिंग, वँदाशान आणि लेसर खिंघन माउंटन्स या वन्य प्रदेशात वाघांच्या संख्यावाढीला पोषक परिस्थिती असून हे प्रदेश ११९ प्रजननक्षम वाघिणींसह ३०० पेक्षा जास्त अमूर वाघां-(पँथेरा टायग्रिस अल्टेइका)ना सामावून घेऊ शकतात.

चीनमधील हर्बिन इथले ईशान्य वन विद्यापीठ, वाइल्डलाईफ कॉन्झर्वेशन सोसायटी, विश्व प्रकृति निधी - WWF व यू.सी. डॅविस या संस्था, अमूर व्याघ्र राष्ट्रीय राखीव क्षेत्र आणि अन्य गटातील संशोधकांनी 'बायोलॉजिकल कॉन्झर्वेशन' या शोधनिबंध पत्रिकेत अलिकडेच प्रकाशित केलेल्या अभ्यासात हा निष्कर्ष मांडला आहे.

चीनमध्ये अलिकडे झालेल्या सर्वेक्षणांमध्ये किमान ५५ वाघांची नोंद झाली आहे. ही संख्या ३०० वर नेण्यासाठी मोठ्या भक्ष्य जातींचे पुनरुज्जीवन करण्यासह जमीन-वापराचा सर्वसमावेशी आराखडा तयार करणे, अधिवासांना जोडणाऱ्या संचारमार्गांची स्थिती सुधारणे, हानिकारक मानवी हस्तक्षेप टाळणे आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवण्याची गरज संशोधकांनी व्यक्त केली आहे. त्याचबरोबर, प्रजननक्षम वाघिणींशिवाय वाघांची संख्या वेगाने वाढवण्यासाठी अन्य ठिकाणांहून इथल्या भूप्रदेशांमध्ये वाघांचे स्थलांतर करण्यासाठी आवश्यक अभ्यास करण्याची आवश्यकता आहे.

ईशान्य चीनमध्ये १९३० पर्यंत जवळपास ५०० अमूर वाघांचा वावर होता. मात्र, अधिवासाचा ऱ्हास, भक्ष्याची कमतरता आणि शिकारीमुळे वर्ष २००० पर्यंत त्यातील जेमतेम १२ ते १६ वाघ चीन व रशियाच्या सीमेलगतच्या भागात उरले. तेव्हा, नैसर्गिक वन संरक्षण प्रकल्पांतर्गत चीनने या प्रदेशातील वृक्षतोड बंद केली. परिणामी या भागात काम करणारे वन कामगार इतरत्र स्थलांतरित झाले. राखीव निसर्ग क्षेत्रांची निर्मिती, शिकार प्रतिबंधक उपाययोजना आणि माणूस-वाघ संघर्ष प्रसंगी भरपाईची तरतूद यांमुळे या प्रदेशात वाघांना असलेला धोका आणखी कमी करण्यात चीनला यश आले. त्यानंतर २०१३ ते २०१८ या कालावधीत स्वयंचलित कॅमेरे वापरून केलेल्या सर्वेक्षणांमध्ये चारही प्रदेशांत मिळून ५५ वाघ दिसून आले. लाओयेलिंग प्रदेशात सर्वाधिक वाघ आहेत. त्यामुळे चीनी सरकारने या प्रदेशात रशियाच्या सीमेलगत १४,६०० चौरस किमी क्षेत्र ईशान्य व्याघ्र बिबट्या राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित केले आहे.

**सूत्र** - 'Good Tiger News: Northeast China Is Home to 55 Amur Tigers', www.newsroom.wcs.org, २६.०७.२०२१.

**New!!!**

# Conservation Kaleidoscope

People, Protected Areas and Wildlife in Contemporary India

-----

Edited by Pankaj Sekhsaria

Published by


Kalpavriksh, Duleep Matthai Nature Conservation Trust and Authors Upfront

(Available for pre-publication discount of 30%)

**<u>Synopsis</u>**

*Conservation Kaleidoscope* is a collection of over a 100 edits and accompanying news items that have appeared over the last two decades in the Protected Area Update.

Written by the newsletter's long-time editor, Pankaj Sekhsaria, the individual edits offer an interesting and often counter-intuitive account of the state of wildlife conservation and protected area management in contemporary India. Organised over 14 broad themes in this collection, the book offers a ringside view of conservation that is as challenging and informative as it is insightful and provocative.




**<u>Chapters</u>**

Editor's Note

1. Law, Policy and Governance
2. Human Rights in Protected Areas
3. The Development Threat
4. The Linear Infrastructure Nightmare
5. The Local Context
6. At the State Level
7. Specific Geographies
8. Changing Seasons
9. Tourism
10. Communicating Conservation
11. Tigers and Tiger Reserves
12. Fate of the Elephant
13. Rhinos, Bees, Bats, Dolphins…
14. A Colourful Mosaic.

Price: 650; 450 pp, 140 line drawings by
Ashvini Menon Visual Design Studio
ISBN: 9788195410026

Available for a special
**pre-publication discounted price** of **Rs. 450**

For details write to **psekhsaria@gmail.com**

# दृष्टीकोन

## IUCNच्या सातव्या काँग्रेसच्या निमित्ताने...

मार्सेल, फ्रान्स इथे ३ ते १० सप्टेंबर २०२१ दरम्यान झालेल्या ह्या जागतिक परिषदेने वन्यजीव संवर्धन-संरक्षणाचे संपूर्ण मानवजातीच्या भल्याशी असलेले नाते अनेक प्रकारे अधोरेखित केले. दर चार वर्षांनी होणारी ही जागतिक परिषद म्हणजे वन्यजीवांचा जागतिक पातळीवर उमटणारा बुलंद आवाज म्हणता येईल. १९४८ साली तिची स्थापना झाली. जगभरातील विविध समाजघटकांना, लोकसमूहांना निसर्गाचे एकात्म स्वरूप, विविधता जतन करण्यासाठी प्रोत्साहित, प्रभावित करणे आणि नैसर्गिक संसाधनांचा कोणताही वापर समन्यायी, शाश्वत स्वरुपात होत असल्याची खातरजमा करत राहणे ही तिची प्रमुख उद्दिष्टे. आजमितीला तिचे ९१ देश, १२१ सरकारी यंत्रणा, ११०७ सामाजिक तर १०६ आंतरराष्ट्रीय सामाजिक संस्था, २३ स्वायत्त लोकसमुदाय , १६० पेक्षाही अधिक देशांमधील वैज्ञानिक आणि व्यावसायिक संस्था मिळून १४०० पेक्षा जास्त सभासद जगभरात आहेत.

तीन कळीचे धोरणात्मक मुद्दे ह्या अधिवेशनात मांडले गेले. कोविड महामारीतून जग पुन्हा उभे राहत असताना त्यात निसर्गाची भूमिका काय असेल हे अभ्यासणे, निसर्गाला फायदेशीर प्रकल्पांमध्ये थेट गुंतवणूक करण्या/वाढवण्यावर भर देण्यासाठी आवश्यक बदल जागतिक वित्तीय यंत्रणांमध्ये कसे घडवून आणता येतील याचा विचार करणे, संयुक्त राष्ट्रसंघाच्या जैववैविध्य करारात सहभागी सदस्य राष्ट्रांनी २०२० नंतरच्या कालखंडासाठी निश्चित केलेला जैववैविध्य संवर्धनाच्या आराखड्याचा स्वीकार करून त्यानुसार निश्चित कार्यवाही करणे हे ते तीन मुद्दे.

जैववैविध्य आणि हवामान बदल हे एकमेकांशी खूप निगडित असणारे दोन घटक. ह्या दोन्ही क्षेत्रांतील प्रश्न अग्रक्रमाने सोडवले जाण्याची गरज इथे मांडली गेली. सदस्य घटकांनी त्यासाठी ठोस कृतीप्रती आपली बांधिलकीही स्वीकारली. सदर काँग्रेसमध्ये १५०० पेक्षा अधिक सहभागींनी १५० ठराव केले. त्यात इंटरनॅशनल युनिअन फॉर कॉन्झर्वेशन ऑफ नेचर - IUCN क्लायमेट क्रायसिस कमिशन निर्माण करण्याचा महत्वाचा ठरावही आहे. हवामान बदलाच्या संकटाशी झुंजण्यात सृष्टीव्यवस्था (ecosystems), संरक्षित-संवर्धित प्रदेश यांचे व्यवस्थापन, नियोजन काय भूमिका बजावू शकेल, समुदाय-आधारित काय उपाय करता येतील हयावरही विचारविनिमय झाला. हवामान बदलामुळे सर्वाधिक बाधित होणाऱ्यांना त्यात कसे सामावून घेता येईल हाही विचार झाला.

आय.यू.सी.एन.ची 'रेड लिस्ट' ही जागतिक जैववैविध्याच्या स्थितीबाबतची सर्वाधिक अधिकृत मार्गदर्शिका. अधिवेशनात तिची, जगातील एकूण ८,७५४ जातींची सद्यस्थिती सूचित करणारी नवी आवृत्ती प्रकाशित केली गेली. सदर यादीत भारतातील ३६ जातींवर टिपणी केली आहे. भारतातील ३० जातींना धोका वाढल्याने रेड लिस्टमध्ये त्या वर सरकल्या आहेत तर केवळ सहा जाती घटत्या धोक्याच्या श्रेणीत आहेत. डेक्कन बार्ब, निलगिरी मिस्टस, देवळाली मिनो ह्या दक्षिण भारतातील मत्स्य जाती, तसेच कावेरीमधील प्रदेशनिष्ठ बोवनी बार्ब ही जाती, ह्या सर्वच 'नामशेष झाल्या असण्याची शक्यता' असलेल्या गटात गेल्या आहेत. सातारा गेको आणि यलो मॉनिटर या सरपटणाऱ्या प्राण्यांच्या सह्याद्रीतील प्रदेशनिष्ठ दोन जाती अनुक्रमे 'अति धोक्यात' आणि 'धोक्यात' आलेल्या प्राण्यांच्या गटात आहेत. कोकोनट क्रॅब हा जगातील सर्वात मोठा संधिपाद प्राणी वाढत्या धोक्याचा सामना करतो आहे. भरतपूर अर्थात केवलादेव राष्ट्रीय उद्यानाचे आकर्षण असणारा सायबेरियन क्रौंच, तसेच इथलीच बफी फिश आऊल, मलय आऊल ही घुबडे नामशेष झाल्याचा संशय आहे. पिंक-हेडेड डक तर १९५० पासून नामशेष मानले जाते आहे. टेंटॅकल्ड बटरफ्लाय रे, ड्वार्फ सॉ फिश ह्या जातींसह मिलेपोरा बॉशमई हे प्रवाळही नष्ट झाले असावे.

१९६९ मध्ये तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींच्या प्रयत्नाने ही परिषद भारतात झाली होती. तिच्या २०२१ मधील निर्णयांशी आपली बांधिलकी राहील हे पाहणे प्रत्येक संबंधिताचे कर्तव्य आहे. **- संतोष शिंत्रे**

पुणे-स्थित लेखक आणि पर्यावरण पत्रकार
santoshshintre18@gmail.com

For private circulation/Printed Matter

To

From: **Kalpavriksh,** Apt. 5, Sri Dutta Krupa,
908 Deccan Gymkhana, Pune 411004